महावितरण
(महाराष्ट्र सरकारचा उपक्रम)
CIN : U४०१०९MH२००५SGC१५३६४५
सामुग्री व्यवस्थापन कक्ष, प्रकाशगड, १ ला मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
फोन - २६४७४२११ / २६४७२१३१, फॅक्स - ०२२ - २६४७३४२९, ग्राम - मुंबई ग्रीड - मुंबई, ई - मेल - cestores@mahadiscom.in

जा. क्र. मु.अ./साव्यक/ 001510

दिनांक : 10 MAY 2016

प्रति,
मुख्य अभियंता,
म. रा. वि. वितरण कंपनी मर्या.,
परिमंडळ कार्यालय,
अमरावती / अकोला / औरंगाबाद / बारामती / भांडूप / चंद्रपूर / गोंदिया /कल्याण /
नागपूर (शहर)/ नाशिक / नांदेड /पूणे / कोल्हापूर / जळगांव / लातूर / रत्नागिरी.

<u>विषय</u> : नविन रोहित्र खरेदी करण्याकरीता लागणारा निधी डीपीसीच्या नाविन्यपूर्ण योजनेतून उपलब्ध करुन घेण्याबाबत.

वरील संदर्भिय विषयानुसार कळविण्यात येते की, आपल्या परिमंडळ कार्य क्षेत्रात सतत वाढणा-या अतिरिक्त, बेकायदेशीर भारामुळे रोहित्र जळणे किंवा नादुरुस्त होणे याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे ग्राहकांना सुरळीत व योग्य दाबाने वीज पुरवठा करण्यासाठी त्या ठिकाणी नवीन दुरुस्त रोहित्र लवकर बसविणे आवश्यक असते. ग्रामीण भागातील ग्राहक विशेषतः महिला , विद्यार्थी आणि शेतकरी यांना वीजे अभावी अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या सर्व बाबी विचारात घेऊन परिमंडळनिहाय मुख्य अभियंता यांनी आपल्या जिल्हयांच्या डीपीसीच्या नाविन्यपूर्ण योजनेमधून नविन रोहित्रे खरेदी करण्यासाठी निधी उपलब्ध करुन घेण्याबाबत माननीय पालकमंत्री/ जिल्हाधिकारी यांचेकडे पाठपुरावा करावा. निधीची मंजुरी उपलब्धता झाल्यानंतर त्याचा अहवाल या कार्यालयास कळविण्यात यावा. निधीच्या उपलब्धतेनुसार मुख्य कार्यालयाद्वारे नविन रोहित्रे खरेदी करण्याची कार्यवाही करता येईल. तरी याबाबतची कार्यवाही या कार्यालयास त्वरीत अवगत करण्यात यावी.

मुख्य अभियंता (साव्य)

**प्रत सविनय सादर -**
१) संचालक (संचलन)/ (प्रकल्प)/ (वित्त), महावितरण, मुंबई.
२) कार्यकारी संचालक -२, महावितरण, मुंबई.

**प्रत सादर -**
अधिक्षक अभियंता (सवसु), महावितरण, अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम, बुलढाणा, औरंगाबाद(शहर), औरंगाबाद(ग्रामीण), जालना, नाशिक (शहर) , मालेगाव, अहमदनगर, नांदेड, परभाणी, हिंगोली, पुणे (ग्रामीण), रास्तापेठ, गणेशखिंड, बारामती, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, लातूर, बीड, उस्मानाबाद, जळगांव, धुळे, नंदुरबार, कल्याण-१, कल्याण-२, वसई, पेण, ठाणे (शहर), वाशी, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भांडारा, गोंदिया, रत्नागिरी, सिंधुदुर्ग.